महाराष्ट्र शासन

# सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर


शासकिय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

दुरध्वनी क्रं.:- ०७१२-६४६५१४५/१४६,

Web Site :- www.rdtenagpur.org.in E-Mail :- ronagpur@dtemaharashtra.gov.in


क्रमांक :- तंशिस/विकाना/डीबीटी पोर्टल /२०२१-२२/ 1488 दिनांकः- 04 MAY 2022

प्रति,
प्राचार्य /संचालक,
शासकीय,अनुदानित, खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित,
पदवी/पदव्युत्तर पदवी व पदविका संस्था,
नागपूर विभाग, नागपूर.

विषय :- पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती योजना अंतर्गत प्रलंबित अर्ज तात्काळ निकाली काढण्याबाबत

संदर्भ :- मा. संचालक, तंशिसं, म.रा.मुंबई , यांचे कार्यालयाचे पत्र. क्र.१८/तंशिसं /डीबीटी/ विका /२०२१-२२ /११२/ दि. ०२ /०५ /२०२२

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येत की, पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती योजना अंतर्गत भरण्यात आलेले परंतु संस्था स्तरावर प्रलंबित असलेले अर्ज तात्काळ 7 दिवसाच्या आत निकाली काढण्यात यावे. जेणेकरुन विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती लाभ विहित मुदतीत घेणे शक्य होईल.

तसेच सोबत जोडलेल्या पत्रातील निर्देशाचे पालन करुन कार्यवाही करण्यात यावी.

(डॉ. मनोज भा. डायगव्हाने)
प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
नागपूर

FIC

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य.

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९४८६ /४८७
ई-मेल - desk18@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

तात्काळ : स्पीड पोस्ट / ई-मेलद्वारे

क्रमांक :- १८/तंशिसं/डीबीटी/विका/२०२१-२२/ ११२
दिनांक :- ०२/०५/२०२२

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.

विषय : पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती योजना राबविताना येणाऱ्या अडचणीबाबत आयोजित ऑनलाईन बैठक
संदर्भ : सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग पत्र क्र. बैठक:२०२२/क्र.१२२/शिक्षण/-१, दि.२८ एप्रिल, २०२२.

महोदय,

उपरोक्त विषयाच्या व संदर्भीय पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग मंत्रालय, मुंबई याचेकडून डीबीटी पोर्टलवर योजना राबविणाऱ्या सर्व संबंधीत शासनाचे विभाग व संचालनालया सोबत दि. २९/०४/२०२२ रोजी ऑनलाईन बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून डीबीटी पोर्टलव्दारे राबविण्यात येत असलेली केंद्र व राज्य शासनाची योजनेतंर्गत भरण्यात आलेले परंतू, विद्यार्थी व संस्थास्तरावर प्रलंबित असलेले अर्जाबाबत नाराजी व्यक्त केली व संबंधित संचालनालयाच्या अंतर्गत येणाऱ्या संस्थांना संबंधित संचालनालयाकडून देखील संस्था स्तरावर प्रलंबित असलेले अर्ज ८ दिवसाच्या आत निकाली काढण्याबाबत व संस्थांनी विद्यार्थीस्तरावर प्रलंबित असलेले अर्ज पूर्ण करुन घेण्याबाबत संबंधित संस्थांना निर्देश देण्याबाबत सदर बैठकीत कळविण्यात आले.

तरी त्या अनुषंगाने सर्व विभागीय कार्यालयांना कळविण्यात येते की, त्यांच्या अधिनस्त येणाऱ्या सर्व संस्थांच्या प्राचार्यांसोबत बैठक घेऊन खालीलप्रमाणे निर्देश देण्यात यावेत व त्याबाबतचा अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा.

१. डीबीटी पोर्टलवर विविध विभागांच्या विविध योजनांसाठी विद्यार्थ्यांकडून भरण्यात आलेले परंतू, संस्था स्तरावर (क्लर्क स्तरावर/ प्राचार्य स्तरावर) तपासणीसाठी प्रलंबित असलेले अर्ज तात्काळ ८ दिवसाच्या आत निकाली काढावेत.
२. विद्यार्थीस्तरावर प्रलंबित असलेले अर्ज (Sent Back) संस्थांनी विद्यार्थ्यांना संपर्क साधून अर्जामध्ये असलेल्या त्रुटी दुर करुन संस्थेकडे तपासणीसाठी मागविण्यात यावेत व संस्थांनी त्यांच्या लॉगीनमध्ये प्राप्त झालेले अर्ज प्रलंबित न ठेवता तात्काळ निकाली काढण्यात यावेत.
३. व्यावसायिक अभ्यासक्रमाध्ये शिकणारा व शासनाच्या संबंधित योजनेसाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांनी जर डीबीटी पोर्टलवर अर्ज भरला नसेल तर अशा विद्यार्थ्यांना संपर्क साधून डीबीटी पोर्टलवर अर्ज तात्काळ भरुन घेण्यात यावेत.
४. जर पात्र विद्यार्थी लागू असलेल्या शासनाच्या योजनेपासून वंचित राहिल्यास त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संस्थेच्या

डीबीटी पोर्टलवर दि. २९/०४/२०२२ रोजीच्या विभागनिहाय/ संचालनालयनिहाय राबविण्यात येत असलेल्या योजनेसाठी विद्यार्थ्यांकडून भरलेले अर्ज, विद्यार्थीस्तरावर प्रलंबित असलेले अर्ज (Sent Back), संस्थांस्तरावर मंजूर/नामंजूर/प्रलंबित असलेल्या अर्जांचा तक्ता माहितीसाठी सोबत जोडलेला आहे.

आपला,

(प्रमोद नाईक)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई.

प्रत :: यांना माहितीसाठी सविनय सादर.

१) मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ४ था मजला, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२

२) मा. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई- ४०००३२. (लक्षवेध : अश्विनी यमगर, अवर सचिव, email id-sandeep.jadhav@nic.in)

२) मा. अपर मुख्य सचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय विस्तार भवन, ७ वा मजला, मुंबई-३२ ( लक्षवेध : फा. नू. पठाण, कक्ष अधिकारी )